**बांधकाम विभाग जिल्हा परिषद,वर्धा.**

**ई-निविदा सुचना**

जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत उप अभियंता बांधकाम उप विभाग जि.प.आर्वी यांना शासकीय कामाचे निरिक्षण / पर्यवेक्षण /तपासणी इत्यादी कामाकरिता वाहन जसे (अर्टीगा,स्कापियो,बोलेरो,स्विप्ट डिझायर ) वाहनाचे मुळ मालक यांचे कडुन ०१ वर्षाचे कालावधी करिता दर निश्चीत करुन भाडे तत्वावर वाहन लावण्याकरिता व्दि लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| **अ.क्रं** | **विवरण** | **निविदा विक्री रक्कम** | **ई-निविदे सोबत ऑनलाईन पध्दीने भरावयाची अनामत रक्कम** | **ई-निविदा प्रसिध्दीचा दिनांक** | **ई-निविदा स्विकारण्यांची अंतीम दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हा परिषद वर्धा अंतर्गत उप अभियंता,बांधकाम उप विभाग,जि.प.आर्वी यांचे करिता जसे (अर्टीगा,स्कापियो,बोलेरो, स्विप्ट डिझायर) वाहन भाडे तत्वावर लावणेबाबत (टॅक्सी परमीट). | रुपये 2000/- | रुपये. 10,000/- | दिनांक 14/05/2026 | दिनांक 28/05/2026 |

ई -निविदा कोणते ही कारण न देता स्विकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा.यांनी राखुन ठेवले आहेत.

**कार्यकारी अभियंता,**
**बांधकाम विभाग जिल्हा परिषद,**
**वर्धा.**

# जिल्हा परिषद वर्धा,अंतर्गत उप विभागीय अभियंता, बांधकाम उपविभाग, आर्वी चे करिता वाहन किरायाने लावण्यासाठी ई-निविदेच्या अटी व शर्ती

| अ.क्रं | ई-निविदेच्या अटी व शर्ती |
|---|---|
| १ | वरिल कामाची निविदा प्रक्रीया संगणकावर ई-निविदा प्रक्रिये व्दारे ऑन लाईन करण्यांत येईल. या निविदे संबंधित या पुढील सर्व सुचना पत्रके ऑन लाईन करण्यांत येतील. |
| २ | वरिल कामाची संपुर्ण माहिती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक१५/०५/ २०२६ रोजीसकाळी १०.०० पासुन ते दिनांक२८/०५ /२०२६रोजी सायंकाळी १८.०० वाजे पर्यत पाहता येतील. व डाऊनलोड करता येतील. |
| ३ | वरिल कामाचे निविदा प्रपत्र BID www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक१५/०५/२०२६ रोजी सकाळी १०.०० पासुन ते दिनांक२८/०५/ २०२६ सायंकाळी १८.०० पर्यत भरता येतील. |
| ४ | सदर कामाचे निविदा करिता रुपये 2,000 /-निविदा फॉर्म रक्कत व बयाना रक्कम रुपये 10,000/-या दोन्ही रक्कमा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ON LINE PAYMENT PROCEDURE प्रमाणे भरायचे असुन त्या करितासंकेत स्थळावरील ON LINE PAYMENT PROCEDURE लक्षात घ्यावी. |
| ५ | सदर अटी व शर्ती मध्ये नमुद केलेल्या कागद पत्राच्या स्कॅन केलेल्या प्रति तांत्रिक लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करणे आवश्यक आहे. |
| ६ | सदर कागदपत्रा बाबत पुर्तता न झाल्यास निविदा अवैध ठरविली जाईल. |
| ७ | लिफाफा क्रमांक १ मध्ये स्कॅन करुन सादर केलेल्या कागद पत्राच्या मुळ प्रति दिनांक३०/०५ / २०२६ रोजी दुपारी १३.०० पर्यत कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग ,जिल्हा परिषद,वर्धा. येथे समक्ष निविदा धारकांनी आणुन देणे आवश्यक आहे. |
| ८ | उपरोक्त कागद पत्र सादर करणेस कोणतेही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. |
| ९ | पुर्ण माहिती भरलेला तांत्रिक लिफाफा क्रमांक १ ऑन लाईन पध्दतीने दिनांक३०/०५ २०२६ रोजी १५.०० वाजता www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जिल्हा परिषद वर्धा येथे उघडला जाईल. |
| १० | पात्र निविदा धारकांस वित्तीय लिफाफा क्रमांक २ उघडण्याची वेळ व दिनांक ई-मेल पत्यावर कळवियांत येईल. |
| ११ | टेंडर सोबत रुपये 10,000/- बयाना रक्कम भरण्यापासुन कोणालाही सुट लागु राहणार नाही. |
| १२ | टेंडर कोणतेही कारण न दाखविता मंजुर करणे अथवा नामंजुर करणे बाबतचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांस राहील. |

| | |
|---|---|
| १३ | टेंडर बिनशर्त असावा.नियंत्रित (मंजुर)दर टेंडर स्विकृतीचे (मंजुरीचे) दिनांका पासुन १ (एक) वर्षाच्या कालावधी करिताग्राहय व बंधनकारक राहतील. |
| १४ | निविदेमध्ये दर भरत्याना ३००० कि.मी पर्यंत दर दर्शविण्यात यावे. ३००० कि.मी च्या वर धाव संख्या झाल्यास प्रती किलो मिटरचे दरवेगळे दर्शविण्यात यावे.तसेच वाहनांचे दर हे ए.सी.सह असावे. |
| १५ | इंधन व वंगन वाहन दुरुस्तीचा खर्च तसेच वाहन चालविण्यांचा खर्च (वाहन चालकाचे वेतन व भत्ते इत्यादी ) वाहन मालकाला करावा लागेल. |
| १६ | वाहनाचा वापर ग्रामीन भाग,डोंगराळ व अतिदुर्गम भागात करण्यात येईल. |
| १७ | वाहन पुर्ण वेळ म्हणजेच २४ तास जिल्हास्तरीय कार्यालयांस उपलब्ध असावे. |
| १८ | वाहन नेहमी सुस्थितीत असावे. |
| १९ | वाहनाची किरकोळ तसेच मोठया स्वरुपाची दुरुस्ती करण्याची जबाबदारी ही गाडी मालकाची राहील. |
| २० | किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एक दिवसात  तर मोठया स्वरुपाची दुरुस्ती ३ दिवसात पुर्ण करण्यांची जबाबदारी वाहन मालकाची राहील. |
| २१ | वाहन दुरुस्ती करिता जास्त कालावधी लागत असल्यास दुसऱ्या वाहनाची पर्यायी व्यवस्था त्वरीत करुन देण्यांची जबाबदारी वाहन मालकांची राहील. |
| २२ | वाहन दुरुस्ती साठी अथवा वाहन दुसऱ्या गावावरुन इंधन भरुन आणण्याची होणारी धावा हि जिल्हा परिषदेच्या कामकाजाच्या धावेत समाविष्ठ होणार नाही. |
| २३ | वाहन केवल मालकाच्या अकार्यक्षमते मुळे बंद राहिल्यास त्यामुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजावर अनिष्ठ परिणाम झाल्यास निर्धारित कंत्रातठरल्या नंतर जे प्रति दिवस दर येईल त्या प्रमाणात तेवढया दिवसाची रक्कम आपले मासिक भाडयाचे वेतनातुन कपातकरण्यांत येईल व संबंधित वाहन मालकाचे नांव काळया यादीत समाविष्ठ करण्यांत येईल. |
| २४ | सदर वाहन राज्य शासकीय नियामा नुसार प्रवासी वाहतुकी करिता परवाना  प्राप्त असलेला असावे. |
| २५ | दर पत्रकातील दर अंकात व अक्षरात स्पष्ट लिहावे. दराचे अंकावर व अक्षरावर काही खोडतोड किंवा उपर लिखान असल्यास त्या ठिकाणी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.अन्यथा निविदा स्विकारल्या जाणार नाही. |
| २६ | पहिल्या सिलबंद लिफाफयात निविदा फी व अनामत रक्कतेचा ई-पेमेंटकेल्याचा तसेच आवश्यक कागदपत्रे जसे वाहन खरेदीची देयक,आर.सी.बुक,इन्शुरंस,वाहन चालकाचा वाहन चालविण्यांचा  RTO कडील परवाना, पी.यु.सी.प्रमाणपत्र, वाहन मालकाचे आधार कार्ड,वाहन चालकाचे आधार कार्ड,वाहन मालकाचे PAN कार्ड,देणे आवश्यक आहे. आणि दुसऱ्या सिल बंद लिफाफयात फक्त वाहन भाडयाने घ्यावयाचे दर पत्रक देणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| | आवश्यक आहे. |
| २७ | लिफाफाक्रमांक ०१ मध्येसादरकरण्यात येणारी सर्व आवश्यक असलेली कागदपत्रे निर्धारित वेब साईट वरिल ई-निविदेसाठी अपलोड कराव्यात. |
| २८ | निविदा सोबत निविदा फी रुपये 2000 /- व अनामत रक्कम म्हणुन रुपये 10,000/- ई-पेमेंट व्दारे द्यावे लागेल. |
| २९ | प्रत्येक महिन्याच्या देयकातुन २% आयकर कपात करुन शासना कडे जमा करण्यात येईल. |
| ३० | पथकर (टोल टॅक्स) चा भरणा वाहन धारकाकडून करावा लागेल. |
| ३१ | भाडयाने लावण्यात येणारे नविन वाहन खरेदीच्या कालावधीत ३ वर्षाचे आतील असावा. (निविदा प्रसिध्दी दिनांकापासुन) |
| ३२ | जिल्हा परिषद वर्धा कडे जमा करण्यात येणाऱ्या अनामात रक्कमेवर व्याज देण्यात येणार नाही.अनामत रक्कम कंत्राट संपल्या नंतर परत करण्यात येईल. |
| ३३ | ज्यांच्या निविदा स्विकृत होतील त्यांनी रुपये 500 /- चे स्टॅम्प पेपर वर करारनामा करुन देणे आवश्यक आहे. |
| ३४ | सर्वात कमी दर असलेल्या वाहनाला भाडयांने लावण्यांस अंतिम आदेश देण्यापुर्वी बांधकाम विभाग अंतर्गत यांत्रिकी शाखेकडून वर्धा यांचेकडून वाहनाची तपासणी करून वाहन योग्य असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील. |
| ३५ | देयकाची अदायगी उपलब्ध असलेल्या अनुदाना प्रमाणे करण्यांत येईल. |
| ३६ | वाहनाचे केंद्रीय मोटार वाहन अधिनियमानुसार आवश्यक ते रजिस्ट्रेशन (नोंदणी) सर्व कर, विमा,परवाने, वाहन सक्षमता प्रमाणपत्र, प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, या बाबतच्या नियमाचे पालन करण्याची जबाबदारी वाहन धारकाची राहील. या बाबतची कोणतेही दाईत्व अथवा जबाबदारी या कार्यालयाची (जिल्हा परिषद वर्धा) राहणार नाही. |
| ३७ | पुरवठा केलेल्या वाहन हे प्रवाशी परवाना प्राप्त असावे (TAXI PERMIT) |
| ३८ | निविदा स्विकारण्यांचा किंवा कोणतेही कारण न दर्शविता संपुर्ण किंवा अंशता निविदा नाकारण्यांचा अधिकार अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांनी राखुन ठेवलेला आहे. |
| ३९ | वाहन मालकी/ वाहन वापरण्यांचा अधिकार सिध्द करु शकणाऱ्या वाहन धारकांनीच सदर्हु निविदा भरावी. |

| | |
|---|---|
| ४० | वाहन पुरवठा दाराकडून वाहन सेवे बद्दलचे देयकतुन योग्यते आयकर व GST विहीत अधिनियमा नुसार करण्यात येईल. |
| ४१ | भांडयाने लावलेल्या वाहनाच्या दररोज केलेल्या प्रवासाच्या नोंदी व त्या बाबतच्या संबंधितांच्या स्वाक्षऱ्या विहित नमुण्यातील लॉग बुक मध्ये वाहन धारक/ वाहन चालकांनी नियमितपणे नोंदविणे आवश्यक आहे. |

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग जिल्हा परिषद
वर्धा

Signature Not Verified
Digitally signed by Shubham Khushal Gundatwar
Date: 2026.05.14 00:09:07 IST
Location: Maharashtra-MH